प्रकरण तिसरे

# जलस्वराज्य प्रकल्प – स्वरूप

# आणि उध्दिष्ठये

## प्रकरण 3

## जलस्वराज्य प्रकल्प – स्वरुप आणि उध्दिष्टये

**प्रस्तावना –:**

म. गाधीजींनी 1937 मध्ये गावासंबंधी काही वर्णन केलेले होते. " आदर्श भारतीय गांव वसवताना स्वच्छतेचा परिपूर्ण विचार केलेला असेल. इथली घरकूले हवेशीर आणि पुरेसा प्रकाश असलेली असतील. पंचक्रोशित उपलब्ध होणाऱ्या साधनांतून या घरकूलांचे बांधकाम केलेले असेल. प्रत्येक घरापुढे प्रशस्त अंगण असेल. यामध्ये घरगुती वापरासाठी भाजीपााल्याची लागवड केली जाईल. गावातले गल्ली, रस्ते, बोळ स्वच्छ असतील. गावाची पाण्याची गरज भासेल इतक्या विहिरी गावात असतील व त्या सर्वासाठी खुल्या असतील. या गावात सर्वासाठी सामूहिक प्रार्थना मंदिर असेल. सामाजिक मालकीचे गावरान असेल. प्राथमिक व माध्यमिक शाळा असेल. गावातले वादविवाद सोडवणारी पंचायत असेल "[1]

वरील विवेचनपूर्ण गांव प्रत्यक्ष कृतीत आणण्याची संधी आपणांस जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून मिळणार आहे. जे अजूनही आपण साध्य केलेले नाही. प्रस्तूत प्रकरणमध्ये जलस्वराज्य प्रकल्पाचे स्वरुप, आवश्यकता, उध्देश, प्रकल्पातील टप्पे तसेच गांव पातळीवरील संस्था व त्यांच्या भूमिका अशी मांडणी केलेली आहे

**1. जलस्वराज्य म्हणजे काय ? –:**

दूष्काळाने आटून गेलेले तलाव, विहरी, नाले,पिण्याच्या पाण्यास होणारी वणवण या अवस्थेबरोबरचं गावात सर्वत्र मुक्त हागणदारी, रोगराईला आमंत्रण, सर्वत्र घाणीचे साम्राज्य असे अनेक मनामध्ये निर्माण करणारे प्रश्न आजचे गांव पाहिल्यावर येतात. याचे मुख्य कारण म्हणजे गावांमध्ये असणारी अस्वच्छता व पिण्याच्या पाण्याचा अभाव होय. या प्रश्नांसाठी शासनाने अनेक योजना राबवल्या, पैसा खर्च केला मात्र गावाची स्थिती काही सुधारली नाही. याची अनेक कारणे आहेत. पैकी प्रमुख कारण म्हणजे योजना तयार करताना ग्रामस्थांचे शासनाने साधे मत विचारात घेतले नाही. म्हणून या सुविधा "आपल्यासाठी आहेत,

आपल्याच आहेत" असे गावकऱ्यांना कधी वाटलेच नाही, मात्र ही स्थिती "जलस्वराज्य प्रकल्प" या योजनेत सहभागी होउन बदलण्याची आशा आहे.

'जल' म्हणजे पाणी, 'स्व' म्हणजे स्वच्छता आणि 'राज्य' म्हणजे आपलं राज्य. म्हणूनचं या प्रकल्पाचे नांव आहे "जलस्वराज्य". आपलं राज्य याचा अर्थ आपली मालकी, आपली जबाबदारी, आपलं व्यवस्थापन. "पिण्याचे पाणी आणि स्वच्छता या दोन प्रश्नाबाबत ग्रामस्थांनी पुढाकार घेउन त्यांच्या गावाला सुयोग्य अशा सोयी—सुविधांची निवड करुन, पुढील सर्व नियोजन, अंमलबजाणी आणि व्यवस्थापन करावे ही या जलस्वराज्य प्रकल्पाची मध्यवर्ती संकल्पना आहे."[(2)] या योजनेतील सर्व सुविधा ग्रामस्थ निर्माण करणार आहेत. यांत शासन आणि स्वयंसेवी संस्थेची मदत मिळणार आहे.

**2. जलस्वराज्य प्रकल्पाची पार्श्वभूमी :—**

पाण्याच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य सधन असले तरी 'ग्रामीणं भागातील पाणी समस्या' हा प्रश्न सतत भेडसावत आहे. यासाठी "शासनाने 1960 पासून सुमारे 16,600 कोटी रु. खर्च करुन अनेक नविन योजना सुरु केल्या"[(3)] मात्र या योजना अयशस्वी ठरल्या गेल्या. या योजना लोकांनी कधीचं स्विकारल्या नाहीत उलट त्याचा गैरवापर केला. उदा. स्वतःच्या फायदयासाठी पाणीपुरवठयाच्या पाईपलाईनमध्ये हेतूपुरक गळती करणे, पाईपलाईनच्या चोऱ्या करणे, सुविधांमध्ये बिघाड निर्माण झाल्यावर ते शासनाचे काम आहे म्हणून त्याकडे दुर्लक्ष करणे. इ. या सर्व योजना अपयशी हाण्याचे प्रमुख कारण म्हणजे यांत लोकसहभागाचा अभाव होता. यांवर उपाय म्हणून शासनाने "27 जुलै, 2000 नंतर 'लोकांचा पुढाकार त्यात शासनाचा सहभाग' हे नविन धोरणाचे ब्रीदवाक्य ठरवले."[(4)] आणि जागतिक बॅंकेच्या सहाय्याने राज्यातील ग्रामीण जनतेने, ग्रामस्थांच्या मागणीनुसार ग्रामस्थांसाठी राबवायचा असा 'जलस्वराज्य प्रकल्प शुध्द् पाणी—स्वच्छ गांव' या उध्द्देशाने सन 2002 मध्ये सुरु केला.

**3. जलस्वराज्य प्रकल्पाचे स्वरुप :–**

'शुध्द् पाणी–स्वच्छ गांव' हे ध्येय असलेला, प्रत्येक गावाला व गावातील प्रत्येक व्यक्तीला शुद्ध आणि पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी, स्वच्छ ग्राम परिसर, निर्मळ शरीर यासाठी आवश्यक असलेला ग्रामीण जनतेने स्वतः जनतेसाठी राबवायचा ' जलस्वराज्य' हा प्रकल्प महाराष्ट्र राज्यामध्ये सुरु झालेला आहे. असा प्रकल्प राबवणारे महाराष्ट्र राज्य हे भारतातील पहिलेच राज्य आहे.

सन 2002 मध्ये, सुरुवातीला 3 जिल्हयांतील 30 पथदर्शी ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली. ते जिल्हे म्हणजे पुणे, औरंगाबाद आणि अहमदनगर होय. या तीन जिल्हयांमध्ये जर्मन सरकारच्या मदतीने जलस्वराज्य प्रकल्प राबवण्यात आला. यातून आलेले अनुभव व अडचणी लक्षात घेऊन या प्रायोगीक गावांच्या यशावर महाराष्ट्रात हा प्रकल्प पुढे सुरु ठेवण्यात आला. त्यानुसार सन 2004 मध्ये महाराष्ट्रातील सांगली, सातारा, ठाणे,नाशिक, उस्मानाबाद, यवतमाळ, बुलढाणा, नागपूर आणि चंद्रपूर या 9 जिल्हयांमध्ये सुरु केला. तद्नंतर सन 2005 मध्ये सिंधुदुर्ग, कोल्हापूर, रत्नागिरी, सोलापूर, लातूर, बीड, परभणी, जालना, हिंगोली, वाशिम, अकोला, जळगांव, नंदूरबार, गडचिरोली, वर्धा, भंडारा आणि गोंदीया या 17 जिल्हयांमध्ये जलस्वराज्य प्रकल्प सुरु करण्यात आला आहे.

"सध्या महाराष्ट्राच्या 26 जिल्हयांमधील 3500 ग्रामपंचायतीची निवड या प्रकल्पामध्ये केलेली आहे."[5] या प्रकल्पाचे वैशिष्ठय म्हणजे आधीच्या योजनांप्रमाणे सर्व गांवावर हा प्रकल्प न लादता इच्छुक गांवातच हा प्रकल्प दिला जातो. परंतु एकदा हा प्रकल्प कार्यान्वित केल्यावर गावाला इतर कोणतीही पाणी पुरवण्याची योजना पुढील 17 वर्षे उपलब्ध होत नाही. शासन निकषानुसार या प्रकल्पासाठी गावाची निवड केली जाते. त्यानंतर गावातील पाणी पुरवठयाची स्थिती पाहून प्रकल्प आराखडा तयार केला जातो. या प्रकल्प अंमलबजावणीसाठी ग्रामस्थांना स्वतः पुढाकार घेऊन नियोजन करावे लागते. प्रकल्पाचे काम पाहण्यास गांवात विविध समित्या या स्थापन करण्यात येतात. निर्णय प्रक्रियेमध्ये

महिलांचा सहभाग महत्वाचा मानण्यात येतो. जागतिक बँकेकडून मिळणारा निधी केंद्र सरकारकडून राज्य सरकारला दिला जातो. तेथून तो जिल्हा परिषदेकडे सोपवला जातो. नंतर संबंधित गावाच्या प्रकल्प खात्यामध्ये ठेवला जातो.

**4 जलस्वराज्य प्रकल्पाचे उद्‌देश :–**

पिण्याचे पाणी आणि स्वच्छता या दोन प्रश्नांबाबत गावकऱ्यांनी सुयोग्य सुविधांची निवड करुन त्याची अंमलबजावणी व व्यवस्थापन करणे हे या प्रकल्पाची मध्यवर्ती संकल्पना आहे. तसेच काही उध्दिष्ठये प्रमाणे आहेत.

1) संबंधीत गावातील पिण्याच्या पाण्याच्या आणि स्वच्छतेच्या सुविधांमध्ये सुधारणा करणे.
2) प्रत्येकाचे म्हणणे ऐकले जाईल अशा संस्था गावांमध्ये स्थापन करणे आणि प्रत्येकाला विशेष करुन गरीब लोकांना निर्णय प्रक्रियेत सहभाग करुन घेणे.
3) गावांमध्ये स्थापन केलेल्या संस्थामध्ये महिलांना सहभागी करुन त्यांचे सक्षमिकरण करणे, त्यांचे स्वतःचे विचार मांडण्यांसाठी, पाणी व स्वच्छता या प्रश्नांवर आपली मते मांडण्यासाठी व गावातील इतर अडचणी सोडवण्यासाठी महिलांचा क्षमता विकास करणे.
4) वैयक्तिक, घरगुती व परीसर स्वच्छतेच्या सवयीमध्ये बदल करुन गांवातील लोकांचे आरोग्य सुधारणे.
5) गावातील लोकांच्या गरजा काय आहेत? याकडे अधिक लक्ष देण्यासाठी गांव पातळीवरील यंत्रणा चांगल्या रीतीने कार्य करतील (विशेष करुन ग्रामपंचायत) अशी परिस्थिती निर्माण करणे, गावातील लोकांशी संवाद साधून व निधीचा योग्य वापर करण्यातून हे उध्दिष्ठ साध्य करणे.
6) पाडया–वस्तीवरील लोकांना पाणी आणि स्वच्छतेची सुविधा व इतर विकासाच्या संधी मिळविण्यासाठी सक्षम करणे.

थोडक्यात, शुध्द् व स्वच्छ पाणी, सर्वांना उपलब्ध करुन देणे, क्षमतांचा विकास करुन महिलांचे सक्षमकिरण करणे, गावामध्ये स्वच्छता राखणे तसेच आदिवासी लोकांचा विकास करणे इ. उध्दिष्ठांच्या पूर्तीसाठी जलस्वराज्य प्रकल्प सुरु आहे.

**5. जलस्वराज्य प्रकल्पाचे नियम :—**

जलस्वराज्य प्रकल्पाचे उध्देश साध्य करण्यासाठी व प्रकल्पाचा निधी मिळविण्यास नियम हे ठरविले आहेत ते पुढील प्रमाणे —

**1. निर्णय प्रक्रियेत क्रियाशील सहभाग :**

निर्णय प्रक्रियेमध्ये गावातील प्रत्येक व्यक्ती आपले मते मांडण्यासाठी आपले हक्क बजावेल.

**2. पारदर्शकता ठेवणे :**

प्रकल्पाचा निधी गावातील सर्वांचा असेल. प्रत्येकाली प्रकल्प विषयक कोणतीही माहिती मिळविण्याचा, नोंदी पाहण्याचा हक्क असेल. खुल्या व्यवहाराच्या बरोबरीने पारदर्शकता म्हणजे सचोटीने आणि निःस्वार्थी वृत्तीने गावासाठी काम करणे. प्रकल्पाचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या गैरफायदा कोणीही घेणार नाही. समिती सदस्यांची निवड स्वतः करावी आणि खरेदी संदर्भातले निर्णय सर्वांच्या समोर घ्यावेत. त्यामूळे प्रत्येकाला स्पर्धेत उतरण्याची संधी प्राप्त होईल. गावातील सर्वोत्कृष्ट कौशल्ये वापरुन सर्वोत्कृष्ट दर्जा मिळविता येईल.पैसे वाचविण्यासाठी दर्जामध्यक तडजोड करु नये तसेच प्रकल्पाचा निधी प्रकल्पावयतिरिक्त इतर कामासाठी वापरता येत नाही.

**3. आपली मालकी :**

प्रकल्पाचे नियोजन, व्यवस्थापन, अंमलबजावणी, देखरेख व निरीक्षण करणे व निधीचे योग्य व्यवस्थापन करण्याची जबाबदारी ग्रामस्थांची आहे. ही सर्व कामे आत्मीयतेने केली तर प्रकल्प आपला असल्याची भावना तयार होईल तसेच प्रकल्पाविषयी स्वमालकीची जाणीव व्हावी म्हणून लोकवर्गणीची अट घालण्यात आली आहे.

**4. समावेश :**

या प्रकल्पामध्ये समाजातील महिला, गरीब, पिडित व अपंग लोकांच्या गरजांचा विचार केलेला आहे. पाणी व स्वच्छता बांधकामाचे ठराव तयार करताना आदिवासी लोकांचा व पर्यावरण प्रश्नांचाही विचार केला जावा. ग्रामसभेमध्ये तांत्रिक पर्याय निवडण्यामध्ये, प्रकल्प अंमलबजावणीमध्ये व प्रकल्प प्रगतीच्या निरीक्षणामध्ये महिला मुख्य भूमिका निभावतील.

**5. आर्थिक जबाबदारी :**

कोणताही आर्थिक व्यवहार करताना आर्थिक नोंदी लिहाव्यात व त्या लेखा परीक्षण करीता उपलब्ध करुन दयावे. तसेच लोकांनी व इतर भागीदारांना वेळोवेळी तपासणीसाठी उपलब्ध करुन दिल्या जातील.

"जलस्वराज्य प्रकल्पामध्ये सक्तीने भूसंपादन करता येत नाही. तथापी जमिन ही खरेदी करता येते."[6] मात्र ती जमिन मालकाच्या मान्यतेशिवाय प्रकल्पाकरीता लागणारी जमिन खरीदी करु शकत नाही. प्रकल्पासाठी जमिन विकत घेताना तिची सध्याच्या बाजारभावाप्रमाणे किंमत करण्यात येते. जर काणी या प्रकल्पासाठी जमिन दान करीत असेल तर ती योग्य त्या कायदेशीर कार्यवाहीनुसार करण्यात येते.

**6. ग्रामपंचायतीचा आदर्श ठराव :–**

जलस्वराज्य प्रकल्पाची ओळख गावातील सर्वांना अधिक तपशिलांत झाल्यानंतर प्रकल्पामध्ये सहभागी होण्याचा निर्णय हा गावाच्या ग्रामसभेने मंजूर करून घ्यावयाचा असतो असा मंजूर करण्यात येणारा आदर्श असा ठराव पुढीलप्रमाणे ...

## "ग्रामपंचायतीचासाठी आदर्श ठराव"

" ———————————— ग्रामपंचायत

दिनांक : / / रोजी झालेल्या ग्रामपंचायत बैठकीमध्ये ठराव क्रमांक ———— नुसार खालील ठराव पारीत करण्यात आला.

1. महाराष्ट्र शासनाच्या जलस्वराज्य प्रकल्पात सहभागी होण्यासाठी जिल्हा परिषदेकडे अर्ज करण्याचे सर्वानुमते मान्य करण्यात आले.
2. प्रकल्प अंमलबजावणी संदर्भात महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी घालून दिलेल्या सर्व अटी आणि मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्याचे सर्वानुमते मान्य करण्यात आले.
3. जलस्वराज्य प्रकल्प राबवण्यासाठी जे उपक्रम करावे लागतील, त्यासाठीची संमती ग्रामसभेमध्ये घेणे व उपक्रमाचा प्रगतीचा अहवाल वेळोवेळी ग्रामसभेला देण्याचे मान्य करण्यात आले.
4. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्थापन करण्यासाठी मदत करण्याचे व प्रकल्प अंमलबजावणीचे काम ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस सोपवण्याचे मान्य करण्यात आले.
5. प्रकल्पासाठी एक स्वतंत्र खाते ——————या बँकेच्या —————— या शाखेत उघडणे आणि ते खाते फक्त या प्रकल्प संबंधीच्या व्यवहारासाठीच वापरण्याचे मान्य करण्यात आले.
6. प्रकल्प अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषदेसोबत कंत्राट (गुत्ता) व आर्थिक करार करण्याचे मान्य करण्यात आले.
7. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या कामावर देखरेख करण्यासाठी व त्यांना मार्गदर्शन करण्याससाठी सामाजीक लेखा परिक्षण समिती स्थापन करण्याचे मान्य करण्यात आले.

सूचक अनुमोदक -(7)

संबधित ग्रामपंचायतीने ग्रामसभेच्या बैठकीमध्ये, 'जलस्वराज्य' प्रकल्पामध्ये सहभागी होण्याचा ठरावाचा अर्ज जिल्हा परिषदेला सादर केल्यानंतर शासन निकषांवर गावाची निवड करते.

**7. ग्रामचपंचायत निवडीचे निकष –:**

गावातील पाण्याची गरज, दारिद्रय रेषेचे प्रमाण, सहकार्य भावना इ. चा विचार गांव निवडताना केला जातो.

**तक्ता 3.1 गांव निवडीचे निकष–**

गुणनिहाय

| अ.क्र | नांव | गुण |
|---|---|---|
| 1. | सध्याची पाणी उपलब्धता | 25 गुण |
| 2. | पाणी टंचाईमूळे टॅकर लावावी लागणारी गावे | 10 गुण |
| 3. | पाणी प्रत (नैसर्गिक व मानवनिर्मित) | 25 गुण |
| 4. | दारिद्रय रेषेखालील कुटूंबाचे प्रमाण | 5 गुण |
| 5. | मागासवर्गीय लोकसंख्या प्रमाण | 10 गुण |
| 6. | आदिवासी लोकसंख्या प्रमाण | 10 गुण |
| 7. | गावातील पूर्वीची पाणीपट्टी वसुली | 5 गुण |
| 8. | संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत बक्षीसे मिळाले असल्यास | 5 गुण |
| 9. | भूजल कायदा व पाणी वाटपाबाबत गाव सहभाग | 5 गुण |

**आधार – जलस्वरसज्य– पाणी पुरवठा स्वच्छता समिती महाराष्ट्र शासन पृ. क्र 7**

जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेचा ठराव आपला जिल्हा प्रकल्पात सहभागी होण्यासाठी जिल्हा परिषदेची तयारी व प्रकल्पाचे सर्व नियम पाळण्याची हमी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत ठराव घेऊन दयावी लागते. तसेच प्रकल्पाचे धोरणात्क निर्णय घेण्याचे सर्वाधिकार जिल्हा पाणी व्यवस्थापन व स्वच्छता समितीला म्हणजेच जिल्हा पाणी

पुरवठा व जलसंधारण समितीला प्रदान करावे लागतात. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या बांधीलकीच्या स्तरावरुन किमान 6 महिन्यातून एकदा त्या कार्याचा आढावा घेण्यात येतो. यामध्ये जागतिक बॅंकेचे अधिकारी सहभागी होतात.

**8. जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत सुविधा –:**

लोकसहभागातून पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या माध्यमातून संपूर्ण ग्रामविकास करण्यास म्हणजेच लोकांमध्ये "आमचा विकास आमच्या हाती" ही भावना जागृत करण्यास आवश्यक त्या खालील सुविधा अंतर्भूत आहेत.

**अ) ग्रामीण पाणीपुरवठा –**

पिण्याचे पाण्याचे स्त्रोत बळकटीकरण करणे, त्यांचे पुनर्भरण करणे, जुन्या योजनांचे पुनर्जीवन करणे, जल स्त्रोतांचा विकास करणे, जुन्या सुविधांचा पुरेपुर वापर व यातून गरज भासत नसली तर किमान खर्चाची नविन् सुविधा निर्माण करणे, तसेच केंद्र शासनाचा 'स्वजलधारा' कार्यक्रम या प्रकल्पाचा भाग झाला असून तो याप्रमाणेच याच तत्वावर राबविला जातो.

**ब) ग्रामीण स्वच्छता –**

गावामध्ये शोषखड्डे खोदणे, घन कचऱ्याचे व्यवस्थापन करणे, सार्वजनिक शौचालये बांधणे व गावामध्ये स्वच्छता राखणे, संपूर्ण गांव हागणदारी मुक्त करणे आणि केंद्र शासनाचा "संपूर्ण स्वच्छता अभियान कार्यक्रम" या प्रकल्पाचा निगडित भाग आहे.

**क) महिला सबलीकरण –**

महिलांच्या क्षमता निर्मितीसाठी निधी उपलब्ध करुन देणे, महिलांना आर्थिक विकासात सहाय्य करणे, तसेच स्वयंसेवी गटामार्फत महिला सबलीकरणाची अंमलबजावणी करणे.

**ड) निवडक ग्रामपंचायतींना लोकसहभागातून इतर विकास क्षेत्रसाठी सहाय्य –**

पहिल्या टप्प्यांतील 9 जिल्हयांतील अशा 288 ग्रामपंचायती, की ज्या पाणीपूरवठा, स्वच्छता, महिला सबलीकरण व लोकांनीच ठरविलेल्या इतर निकषानुसार उत्कृष्ठ काम करतील शिक्षण, आरोग्य अशा मूलभूत सुविधा सुध्द्ा ग्रामस्तरावरुन सक्षमपणे हाताळता याव्यात व "आमचे गांव, आम्ही सरकार" या वाटचालीसाठी आवश्यक क्षमतानिर्मिती व्हावी यासाठी.

**इ) निवडक जिल्हा परिषदांना सहाय्य –**

वरील सर्व क्षेत्रत ग्रामपंचायतींना बळकट करण्यासाठी चांगली कामे करणाऱ्या जिल्हा परिषदांना प्रोत्साहन सहाय्य.

**ई) भूजलसाठा क्षेत्र व्यवस्थापन पथदर्शी प्रकल्प –**

- एकात्मिक भूजल साठा क्षेत्र वयस्थापनाकरीता संस्थात्मक रचना, कार्यपध्दतीकरीता,
- प्रत्येक महसूल विभागात एक भूजल साठा क्षेत्र.

**फ) देखभाल व दुरुस्ती पथदर्शी प्रकल्प –**

प्रामुख्याने पाण्याचे दुर्भिक्ष्य असलेल्या गावामध्ये जलस्वराज्य प्रकल्प राबवण्यात येत असतानाच ज्या गावांमध्ये पुरेसे पाणी मिळते, पण देखभाल व दुरुस्तीविषयक समस्या आहेत. अशा गावांसाठी हा प्रकल्प राबविण्यात येतो.

**9. जलस्वराज्य प्रकल्पाकरीता संस्थात्क यंत्रणा –:**

**अ. राज्यस्तर –**

1. विचारवंत सल्लागार गट
2. शक्ती प्रदान समिती
3. प्रकल्प सल्लागार गट
4. क्षेत्र सुधारण सहाय्य कक्ष, पाणी पुरवठा व सवच्छता विभाग
5. अंमलबजावणी व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष

**ब. विभागस्तर–**

1. विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली समन्वय समिती
2. प्रादेशिक सुलभकर्ता आणि सनियंत्रण व मूल्यमापन तज्ज्ञ अशा दोन बाहय तज्ज्ञांच्या सेवा.

**क. जिल्हास्तर –**

1. जिल्हा परिषदेमार्फत प्रकल्पाचे नियमानुसार ग्रामपंचायतकडून अंमलबजावणी करुन घेणे, मार्गदर्शन निधी वितरण, संनियंत्रण इ. कामे करण्यात येतात. जिल्हा परिषदेतील जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला प्रकल्पाच्या जिल्हास्तरावरील सर्व धोरणात्मक निर्णयाचे अधिकार दिलेले आहेत. मात्र राज्य शासन व जागतिक बॅंक यांच्यात झालेल्या करारानुसार व प्रकल्पाच्या नियमांर्गत त्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी या समितीची आहे.

2. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली व अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समन्वयाने जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा कार्यान्वित केली असून प्रकल्पाची प्रत्यक्ष जबाबदारी या यंत्रणेवर आहे.

**ड. जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागातील स्वतंत्र गटांची स्थापना –**

1. जिल्हा सुलभीकरण गट (डी. एफ. टी)
2. जिल्हा मुल्यांकन व संनियंत्रण गट (डी. ए. एम. टी)
3. जिल्हा आर्थिक व्यवस्थापन कक्ष (डी. एफ. एम. टी)
4. जिल्हा प्रशासन सहाय्य कक्ष (डी. ए. एस. टी)

**इ. ग्रामस्तर –**

या संस्थात्मक यंत्रणेचा अभ्यास गांव स्तरावरील संस्थाच्या भूमिका या भागामध्ये सविस्तर करण्यात आलेला आहे.

**10. प्रकल्पातील टप्पे —:**

जलस्वराज्य प्रकल्पामध्ये चार टप्पे आहेत.

**1. नियोजन —**

ग्रामपंचायत कृती आराखडा तयार केला जातो. यामध्ये पाणी, स्वच्छता, क्षमता बांधणी व महिला सक्षमीकरण या संदर्भात त्यांच्या महत्वकांक्षा स्पष्ट दिसतात.

**2. मुल्यमापन —**

यामध्ये गावकृती आराखडा हा आर्थिक, तांत्रिक व पर्यावरणाच्या दृष्टीने योग्य असल्याचे प्रमाणित केले जाते.

**3. अंमलबजावणी —**

पाणी आणि स्वच्छता, सेवा आणि लोकांच्या कौशल्यांमध्ये सुधारण करण्यास ग्रामपंचायत कृती आराखडयानुसार कामास सुरुवात केली जाते.

**4. देखमाल व दुरुस्ती —**

पाणी आणि स्वच्छता सुविधांची योग्य देखभाल घेतली जाते.

**11. ग्रामस्तर प्रकल्प अंमलबजाणी व कालावधी —:**

**1. पूर्व नियोजन — (3 महिने)**

ग्रामस्तरीय प्राथमिक जाणीव जागृती व क्षमता निर्मिती —

ग्रामपंचायतीला तिची प्राथमिक निवड झाल्यावर प्रथम रु. **40,000** पर्यत निधी ग्रामस्तरीय प्राथमिक जाणीव जागृती व क्षमता निर्मितीसाठी देण्यात येतो. हा निधी 'जलस्वराज्य' नावाने उघडलेल्या ग्रामपंचायतीच्या स्वतंत्र बँक खात्यात जमा होतो. ग्रामपंचायत सदस्य, गावातील सहाय्यक संस्था, (महिला मंडळ, युवक मंडळ, सहकारी संस्था) स्वयं–सहाय्यता/बचत गट, भजनी मंडळ, इ. ची शिबिरे घेण्यात येतात. तसेच ग्रामस्तरावरील कर्मचारी, शिक्षक, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक, तलाठी, आरोग्य सेवक, पाणीपुरवठा सेवक, वन कर्मचारी, पाडासेवक इ. साठी स्वतंत्र व एकत्रीत **शिबिरे** घेण्यात

येतात. या प्रक्रियेच्या शेवटी ग्रामपंचायतीत सर्वांना याची माहिती झाल्यानंतर सर्वानुमते ग्रामसभेत ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, सामाजीक लेखा परीक्षण समिती व महिला विकास समितीची स्थापना केली जाते. त्यानंतर ग्रामपंचायत पुढील सर्व जबाबदारी या समित्यांवर सोपवली जाते.

"ग्रामस्तरावर जलस्वराज्य प्रकल्पासाठी उघडावयाच्या स्वतंत्र खात्याचे नामाभिमान 'ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, ग्रामपंचायत' असे केले जाते. जलस्वराज्य स्वतंत्र खाते प्रथम रु. 40,000/– चा निधी विनीयोग करण्यासाठी सरपंच किंवा इतर पंच (त्यामध्ये एक महिला) यांचे सहीने घेतले जाते. मात्र पाणीपुरवठा व स्वच्छता समिती स्थापन झाल्यावर त्यातील किमान दोन सदस्यांच्या (एक महिला) सहीची आवश्यकता असते. ग्रामपंचायतीला तशी माहिती ग्रामसभा ठरावासह बँकेला त्वरीत पाठवावी लागते."[8]

**2. सुविधांचे नियोजन – (6 महिने)**

स्त्रोत निश्चिती, तांत्रिक पर्याय निश्चिती, योजना नियोजन, प्राकलाने व आराखडे, अंमलबजावणी, मालखरेदी नियोजन, निविदा, आवश्यक प्रशिक्षण व जबाबदारी निश्चितीकरण यामध्ये केले जाते.

**3. सुविधांचे प्रत्यक्ष बांधकाम – (9 महिने)**

सुविधा व उपाययोजनांची प्रत्यक्ष उभारणी करणे.

**4. देखभाल व दुरुस्ती – (3 महिने)**

प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर देखभाल व दुरुस्तीची पूर्ण जबाबदारी ग्रामस्थांच्यावर सोपविली जाते. मात्र हा कालावधी गावाची लोकसहभागातून काम करण्याची क्षमता बांधणी, उत्साह याप्रमाणे कमी–अधिक होत असतो.

**12. ग्रामस्तरावरील संस्थांच्या भूमिका –:**

ग्रामस्तरावर ग्रामसभा, महिला गामसभा, ग्रामपंचायत, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, महिला विकास समिती, सामायिक लेखा परीक्षण समिती व त्यांच्या

उपसमित्या स्थापन झालेल्या दिसून येतात. त्यांच्या भुमिका पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतात.

**अ) महिला ग्रामसभा :–**

"गावाच्या विकास प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी, महिलांना आपले म्हणणे निर्भयपणे मांडता येण्यासाठी आणि त्यांच्या प्रश्नांवर योग्य निर्णय घेता येण्यासाठी गावामध्ये महिला ग्रामसभा घेणे महत्वाचे ठरते."[१] महिला ग्रामसभा घेण्याची जबाबदारी ही संबंधित गावच्या ग्रामपंचायतीची आहे. महिला ग्रामसभा ही गावातील सर्व महिला मतदारांची निर्णय घेणारी यंत्रणा आहे. अशा महिला ग्रामसभा घेण्याच्या काही पध्दती –

1. मुख्य ग्रामसभेच्या एक दिवस आधी महिला ग्रामसभा घेणे आवश्यक असते.

2. महिला ग्रामसभेला गामपंचायतीच्या सर्व सदस्यांनी आणि शासकीय पातळीवरच्या सर्व सदस्यांची उपस्थिती आवश्यक असते.

3.महिला ग्रामसभेत झालेल्या ठरावांचे व मुख्य ग्रामसभेत झालेल्या ठरावांचे वाचन ग्रामसेवकांनी करणे बंधनकारक असते.

4. महिला ग्रामसभेतील ठराव आणि मुख्य ग्रामसभेतील ठराव त्यांच्या प्राधान्यक्रम ठरवून घेवून कामाची आखणी करणे आवश्यक असते.

*** महिला ग्रामसभेची भूमिका ***

गावातील महिला ग्रामसभेला जलस्वराज्य प्रकल्प अंतर्गत गावाच्या विकासासाठी फार महत्वपूर्ण भूमिका पार पाडावी लागते ती पुढील –

1. सर्व महिलांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करुन घेणे.

2. ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, महिला विकास समिती, सामाजीक लेखा परीखण समिती व उपसमित्यांच्या सदस्यत्वासाठी महिलांची नांवे सुचवूणे.

3. ग्रामपंचायत, ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, महिला विकास समिती, सामाजीक लेखा परीक्षण समिती व उपसमित्यांमध्ये महिलांना समिती प्रमुख म्हणून निवडणे.

4. महिला सक्षमीकरणाचा आराखडा तयार करणे.

**आ. ग्रामसभा –**

जलस्वराज्य प्रकल्पाच्या निमित्ताने गांवात वारंवार बैठका होत असतात. या बैठकांना ग्रामस्थांची उपस्थिती व निर्णय प्रक्रियेत सहभाग महत्वाचा असतो. ग्रामसभेच्या मंजूरीने हा प्रकल्प पुढे सरकत असतो. म्हणूनच गावाच्या ग्रामसभेला अनन्य साधारण असे महत्व येते. अशी ही ग्रामसभा कशी घ्यावी याविषयी काही नियम खालील प्रमाणे केलेले दिसतात.

1. ग्रामसभेची वेळ, दिवस, ठिकाण सर्वांना सोयीचे असावे.

2. ग्रामसभेच्या बैठकीची रीतसर नोटीस काढलेली असावी. त्यामध्ये सभेचे विषय नमूद केलेले असावेत.

3. ग्रामसभेच्या तीन दिवस आधी गावात दवंडी दिली पाहीजे. किंवा स्पिकरवरुन तसे सांकगतले पाहीजे.

4. ग्रामसभेने निवडलेल्या मतदारांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा घेण्यात यावी. (अपवाद–निवडणुकीनंतरची पहिली ग्रामसभा)

5. ग्रामसभेच्या एक दिवस आधी ग्रामपंचायतीची व इतर विकास समितीच्या बैठका झालेल्या असाव्यात.

6. ग्रामसभेच्या विषयासंदर्भात लोकांना काही मत मांडायचे असेल तर ग्रामसभेपूर्वी आणि ग्रामपंचायतीच्या बैठकीपूर्वी ते ग्रामपंचायतीकडे लेखी स्वरुपात देण्यात येते. यामूळे लोकांकडून आलेल्या सूचनांचा, तक्रारींचा, मागण्यांचा आढावा ग्रामसभेपूर्वी घेतल्या जाणाऱ्या या ग्रामपंचायतीच्या बैठकीमध्ये घेण्यात येतो. प्रत्यक्ष ग्रामसभेत त्याविषयी मांडणी करणे सोपे जाते.

"निर्णय प्रक्रियेत लोकांचा सहभाग वाढावा यासाठी वर्षातून किमान बारा ग्रामसभा गावात घेण्यात येतात. ग्रामसभा बोलावण्याची जबाबदारी ही सरपंच, उपसरपंच यांची असून

ते ग्रामसभा घेण्यास टाळाटाळ करीत असतील तर ग्रामसेवक हा ग्रामसभा घेतो. या ग्रामसभेला गावापातळीवरील शासकीय कर्मचारी उपस्थित राहणे आवश्यक असते. त्यांच्या कामाचा आढावा ग्रामसभा घेत असते. जर या कर्मचाऱ्यांचे काम ग्रामसभेला पसंत नसेल तर तसा अहवाल गट विकास अधिकारी (बी. डी.ओ.) कडे पाठवता येतो. गट विकास अधिकारी यांनी हा अहवाल मिळाल्यापासून तीन महिन्याच्या आत त्यावर कारवाई करणे कायदयाने बंधनकारक आहे. जर कारवाई झाली नाही तर ग्रामसभा उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांकडे तक्रार करु शकते. त्यानांही तीन महिन्याच्या आत त्यावर कारवाई करणे गरजेचे असते."[10]

*** ग्रामसभेची भूमिका ***

1. प्रकल्पामध्ये सहभागी व्हायचे की नाही ते ठरवणे.
2. गावातील ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास समित्यांची निवड करणे.
3. गावपातळीवर कोणत्या क्षमतांची वाढ करणे आवश्यक आहे ते ठरवणे
4. गावकृती आराखडयाला अंतीम मान्यता देणे.
5. सहाय्यकारी संस्था व इतर सेवा पुरवठादारांची निवड करणे.
6. खरेदी व निधीचे व्यवस्थापन करणे.

**इ. ग्रामपंचायत –**

ग्रामपंचायतीमध्ये लोकांनी निवडून दिलेल्या सदस्यांचा समावेश होतो. ही सदस्य संख्या लोकसंख्येनूसार ठरत असते. ग्रामपंचायतीमध्ये कमीत कमी 7 व जास्तीत जास्त 17 सदस्य असतात. ग्रामसेवक हा ग्रामपंचायतीचा सचिव असतो. ग्रामपंचायतीची बैठक कधी घ्यावयाची, विषय कसे ठरवायचे, सूचना कशी काढायची इ. सर्व निर्णय सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य घेतात. ग्रामपंचायतीने सभेची सूचना सात दिवस आधी काढणे व तीन दिवस आधी दवंडी देणे गरजेचे असते. सर्वसाधारणपणे मासिक बैठकीचे विषय

कायदयातील तरतुदीनुसार ठरवले जातात. मासिक बैठकीत झालेल्या निर्णयांची माहिती लोकांना देण्याची जबाबदारी ग्रामपंचायत सदस्यांची असते.

*** भूमिका ***

1 प्रकल्पामध्ये सहभागी होण्यासाठी ग्रामपंचायतीकडून अर्ज सादर करणे तसेच गावातील सर्वांपर्यंत प्रकल्पाची माहिती पोहचवण्याचे कार्य पार पाडणे

2 जलस्वराज्य प्रकल्पाचे वेगळे बँक खाते उघडणे. ते ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती स्थापन झाल्यावर ते समितीच्या नावे करणे.

3. प्राथमिक क्षमता बांधणी उपक्रमाचा आराखडा तयार करुन उपक्रम राबवणे. यांमध्ये महिला जागृती कार्यक्रमांचा समावेश होतो.

4. संघठन व क्षमता बांधणी यासाठी सहाय्य करणाऱ्या संस्था व जोडधंदा करणाऱ्यांची नेमणूक करणे.

5. विविध समित्यांची स्थापना करणे व त्यांचे कामकाज सुरळीतपणे चालवण्यास मदत करणे.

6. निधीसाठी विनंती अर्ज देणे व निधी स्विकारणे.

7. ग्रामसभा, महिला ग्रामसभा व पाडा सभा यांची बैठक बोलावणे.

8. सामाजिक लेखा परीक्षण समितीच्या अहवालानुसार योग्य ती कारवाई करणे.

9. जमा झालेल्या पाणीपट्टीतून देखभालाची व दुरुस्तीची व्यवस्था अचुक ठेऊन सुविधा टिकाऊ व कार्यक्षम ठेवणे.

10. प्रकल्प खाते ग्रामपंचायत देखभाल दुरुस्ती खात्यात विलीन करणे.

11. योजनेच्या कामाची वारंवार पाहणी करणे, वेगवेगळया कामांसाठी वेगवेगळया समित्या जरी असल्या तरी एकूणच कामाच्या, साहित्यांच्या दर्जावर लक्ष ठेवणे.

12. समितीच्या कार्याचा प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेणे, नियोजनामध्ये मदत व नोंदी लिहण्यासाठी मदत करणे.

13. समितीच्या कार्याचा प्रगगजीचा अहवाल जिल्हा समितीला सादर करण्याच्या कामी मदत करणे.

जलस्वराज्य प्रकल्पाचे काम ग्रामपंचायतीच्या सर्वसाधारण मार्गदर्शनाखाली झाले पाहीजे अशी अपेक्षा असते मात्र सर्व समित्यांना त्याचवेळी स्वतंत्रपणे काम करु देण्याची काळजी ग्रामपंचायत घेत असते. येथे ग्रामपंचायतीची भूमिका नियंत्रकाची नसून एका मार्गदशकाची असते. याकरीता आवश्यकता असेल तेव्हा लोकांना, विविध समितीच्या सदस्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्थाही ग्रामपंचायत करत असते.

जलस्वराज्य प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीकरीता ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, महिला विकास समिती व सामाजिक लेखापरीक्षण समिती या तीन मुख्य समित्या स्थापन केल्या जातात. याशिवाय खरेदी, हिशोब आणि देखरेख या तीन कार्यगटांची स्थपना केली जाते.

**1.) ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती :–**

ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती ही जलस्वराज्य प्रकल्पाचा मध्यवर्ती आधारस्तंभ असतो. या समितीमध्ये अध्यक्ष, सचिव व खजिनदार असे पदाधिकारी असतात.

*** रचना ***

1. या समितीमध्ये किमान 12 सदस्य किंवा कमाल 24 सदस्य असतात.

2. वरील सदस्यांपैकी 1/3 सदस्य ग्रामपंचायत सदस्यांतून निवडलेले असतात.

3. यामध्ये किमान 50 % महिलांचा समावेश असतो.

4. महिला सदस्यांमध्ये 30 %मागासवर्गीय महिला सदस्य असतात.

5. समितीचे अध्यक्ष, सचिव व खजिनदार यांची निवड करताना महिलांना प्राधान्य देण्यात येते.

*** कामे व जबाबदारी ***

1. गावातील पाणी पुरवठा व स्वच्छता सुविधा यांची सध्यस्थिती समजून घेऊन अडचणीवर चर्चा करुन उपाययोजना सुचविणे.

2. पाणी पुरवठा व स्वच्छता व्यवस्थेमध्ये विविध पर्याय सुचविणे.

3. इतर उपसमित्यांमध्ये समन्वय राखणे.

4. लोकवाटा व पाणीपट्टी वेळेवर कसे जमा होतील हे पाहणे.

5. दुरुस्ती व देखभाल यासाठी विविध कामे करवून घेणे.

प्रकल्प नियोजन, अंमलबजावणी व व्यवस्थापन यामध्ये सर्व सहभागी होत आहेत की नाही हे पाण्याचे कार्य या समितीचे आहे. ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती, ग्रामसभा व ग्रामपंचायत यांना जबाबदार असते.

**2. महिला विकास समिती :–**

महिला विकास समितीमध्ये अध्यक्ष, सचिव व खजिनदार असे प्रमुख पदाधिकारी असतात.

*** रचना ***

1. महिला विकास समितीमध्ये किमान 12 व कमाल 24 सदस्य असतात.

2. यामध्ये 75 % महिलां सदस्य असतात.

3. तसेच महिला मंडळे व बचत गट यांतील महिलांही सदस्य असतात.

*** कामे व जबाबदारी ***

1. सर्व समित्या, उपसमित्यांमध्ये महिलांचे योग्य टक्केवारीत प्रतिनिधीत्व आहे की नाही ते पाहणे

2. महिला ग्रामसभेमध्ये महिला सक्षमीकरणाविषयी चर्चा करून महिला सक्षमीकरणाचा कृती आराखडा तयार करणे.

3. पाणी व स्वच्छता यासंबंधी आपले विचार ग्रामसभेत मांडणे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

4. महिलांच्या गरजांची पडताळणा करून स्वच्छता व पाण्याच्या सुविधेच्या नियोजनात महिलांना सहभागी करून घेणे.

5. महिलांना जोड धंदा शिकवण्यासाठी प्रशिक्षण देणे.

6. ग्रामपंचायत व इतर समित्या यात समन्वय ठेवणे.

**3. सामाजिक लेखापरीक्षण समिती : –**

सामाजिक लेखापरीक्षण समितीमध्ये अध्यक्ष व सचिव असे पदाधिकारी असतात.

*** रचना ***

1. सामाजिक लेखापरीक्षण समितीत कमीत कमी 12 व जास्तीत जास्त 24 सदस्य असतात.
2. त्यापैकी 1/3 सदस्य ग्रामपंचायत सदस्यातून निवडलेले असतात.
3. 50 % महिला सदस्यांचा समावेश असतो.
4. हिशेब व नोंदीच्या ( ऑडिट ) कामाचा अनूभव असलेला किमान एक सदस्य असतो.
5. तसेच बांधकाम क्षेत्राचा अनुभव असलेला एक व्यक्ती असतो.
6. तसेच एकच व्यक्ती एकाच वेळी ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती आणि सामाजीक लेखा परीक्षण समिती या दोन समित्यांची सदस्य असत नाहीत.

*** कर्तव्ये ***

1. जलस्वराज्य प्रकल्प प्रक्रियेवर देखरेख कताना जलस्वराज्याच्या सर्व नियमांचे पालन होत आहे का ? याची खात्री करणे.
2. प्रकल्प प्रक्रियांचे तांत्रिक, आर्थिक व सामाजिक लेखा परीक्षण करणे.
3. आर्थिक व्यवहार चोख ठेवणे तसेच प्रकल्पाचे लाभ सर्व समाज घटकांपर्यत विशेषत: गरीब व पिडीत लोकांपर्यत पाहोचवणे.
4. गावातील महिला, आदिवासी, इतर लोक निर्णय प्रक्रियेत सहभागी होत आहेत की नाही याचे परीक्षण करणे.

5. वेळोवेळी गावाच्या कामाचा अहवाल ग्रामसभा, ग्रामपंचायत व जिल्हा परीषद यांना सादर करणे.

6. कामाचा दर्जा व गुणवत्ता तपासणे.

7. ग्रामसभेमध्ये, झालेल्या खर्चाची मांडणी–चर्चा करून पुढील कार्यवाहीची दिशा ठरवणे.

8. लेखा परीक्षण अहवालावर चर्चा करण्यासाठी विशेष ग्रामसभा बोलावणे.

या तीन समित्यांशिवाय आदिवासी पाडा पाणी पुरवठा व स्वच्छता समिती ही असते. त्याचप्रमाणे ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या खरेदी, हिशोब व देखरेख समिती असतात. या तीन उपसमित्यांना कार्यगट असेही संबोधले जाते.

**13. समारोप :–**

प्रस्तुत प्रकरणामध्ये जलस्वराज्य प्रकल्पाचे स्वरूप, त्यांचा उध्देश, नियम तसेच गावाची निवड कोणत्या शासन निकषांवर केली जाते ? ग्रामपंचायतीचा आदर्श असा ठराव कसा पारीत केला जातो ? याचा सविस्तर अभ्यास या प्रकरणात केलेला आहे. त्याचप्रमाणे या प्रकल्पातर्गत कोणत्या सोयी सुविधा येतात ? त्या राबवण्याकरीता कोणत्या संस्थात्मक यंत्रणा कार्यरत आहेत व त्यांची भूमिका – कार्ये यांचाही अभ्यास करण्यात आलेला आहे.

अशाप्रकारे सदर प्रकरणात जलस्वराज्य प्रकल्पाचे स्वरूप, व्याप्ती व उध्देश यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. तसेच जलस्वराज्य प्रकल्प ग्रामस्तरावर कशा रीतीने व किती कालावधीत राबवला जातो याचाही अभ्यास केलेला आहे.



15243

## संदर्भ:

1. जलस्वराज्य माहिती पुस्तिका : पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,

महाराष्ट्र शासन– पृ. 11

2. प्रकल्प आणि यंत्रणा (जलस्वराज्य प्रकल्प) : पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,

महाराष्ट्र शासन– पृ. 13

3. जलस्वराज्य माहिती पुस्तिका : उपरोक्त ,पृ. 2

4. जलस्वराज्य माहिती पुस्तिका : उपरोक्त ,पृ. 5

5. Monthly Progress Report ( Oct. 2006) – Reform Support and Project Management UNit, Jalswarajya Project, Water Supply and Sanitation Department.

6. ग्रामस्थांसाठी प्रकल्प कार्यवाहीची मार्गदर्शिका (जलस्वराज्य प्रकल्प)

: पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन– पृ. 17

7. प्रकल्प आणि यंत्रणा (जलस्वराज्य प्रकल्प) : उपरोक्त पृ. 20

8. जलस्वराज्य माहिती पुस्तिका : उपरोक्त पृ. 18

9. प्रकल्प आणि यंत्रणा (जलस्वराज्य प्रकल्प) : उपरोक्त पृ.25

10. प्रकल्प आणि यंत्रणा (जलस्वराज्य प्रकल्प) : उपरोक्त पृ. 5